# जिल्हा परिषद अमरावती
**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**
कॅम्प रोड, अमरावती 444 602
Email-ceozp.amravati@maharashtra.gov.in
www.zpamravati.com

दू.क्र. 07212662926


क्रमांक –जिप/मुकाअ/स्वीस/2588/ 2022
दिनांक –2.5. 2022.

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती........ सर्व,
जिल्हा परिषद अमरावती.

**विषय - प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण) अतंर्गत पात्र बेघर लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत..**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण) अतंर्गत पात्र बेघर लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी शासनाच्या विविध योजनेतून जागा उपलब्ध करणे, रक्ताच्या नातेवाईकांकडून पात्र घरकुल लाभार्थ्यांच्या नांवे जागा हस्तांतरण, ई-क्लास, गावठाण, अतिक्रमण नियमाकुल इत्यादी माध्यमातून लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याबाबत आपणासोबत झालेल्या बैठकांमध्ये वेळोवेळी आढावा घेवून सूचना केलेल्या आहेत, तरीसुध्दा अमरावती जिल्हाकडे किमान 13000 लाभार्थींना अद्यापही घरकुलासाठी जागा उपलब्ध होवू शकली नाही.

पंचायत समितीस्तरावर सर्व ग्रामसेवक समवेत तालुकानिहाय आढावा घेताना असे निदर्शनास येत आहे की, घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी ग्रामसेवकांकडून पाहीजे त्या पध्दतीने प्रयत्न होत नाही. यापूर्वीसुध्दा आपण मोहीम स्वरुपात "घरकुल दूत" म्हणून पंचायत समितीस्तरील कर्मचारी, ग्रामसेवक आणि लाभार्थ्यांच्या सहकार्यातून जागा उपलब्ध करुन घरकुलांचे बांधकाम केले आहे. त्याच आधारावर प्रत्येक गांवनिहाय मंजुर लाभार्थी निहाय बेघर असलेल्या लाभार्थ्यांना विविध पर्यायातून जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पुढील 2 आठवडयाचे नियोजन करावे. ज्याठिकाणी सर्व पर्यायातून जागा उपलब्ध होवू शकत नाही अशा ठिकाणची गावनिहाय यादी प्रस्ताव रिमांड करण्यासाठी प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.यं. यांचेकडे सादर करावेत. ज्या ठिकाणी ग्रामसेवकनियोजनाप्रमाणे जागा उपलब्धतः आणि रिमांड करणार नाहीत त्यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव 31मे 2022 पूर्वी सादर करावा.

(अविश्यांत पंडा, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलिपी –
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अमराती यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपणास कळविण्यात येते की, पंचायत समितीस्तरावर वरील सूचनांप्रमाणेकार्यवाही होत आहे याबाबतची खात्री करावी.

[Type text]